# महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०१०(१३९ /१०)विशि-३
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ९ ऑगस्ट, २०१०

प्रति,
कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय : उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्यासाठी सर्व अकृषि विद्यापीठातील कामकाजाचा आढावा तसेच विद्यापीठातील प्रशासकीय व वित्तीय बाबींचे ऑन लाईन पध्दतीने संगणकीकरण करण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने शासनाचे क्र.संकीर्ण-२०१०/(५८/१०)/विशि-२, दि.७ जुलै, २०१० चे पत्र व त्यासोबतची सहपत्रे कृपया पहावीत.

२. सदर प्रकरणी सर्व अकृषि विद्यापीठाचे कुलगुरु व सर्व संबंधित अधिकाऱ्यां समवेत दि.१८ जून, २०१० रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीतील चर्चेप्रमाणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य पदांवरचे मा.उच्च न्यायालयाच्या याचिका क्र.२२१६/२००६ मधील आदेशानुसार सुयोग्य उमेदवाराची नियुक्त करणे आवश्यक आहे. तथापि याबाबत सुयोग्य (Qualified ) अनुभवी , (Experience) असे उमेदवार प्राचार्य पदावर नियमीत (Regular) नियुक्ती करण्यासाठी उपलब्ध होत नसल्याची बाब उपस्थित करण्यात आली होती. या संदर्भात मा.सचिव (उ.व तं.शि.) तसेच उपस्थित कुलगुरुंपैकी बहुतांश प्रतिनिधींनी सेवानिवृत्त झालेल्या अनुभवी (Experience )पात्रताधारक (Qulified ) अशा उमेदवारापैकी जे प्राध्यापक / प्राचार्य संवर्गातील उमेदवार त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर सलंग्नित महाविद्यालयांमध्ये पुर्ननियुक्तीने काम करण्यास इच्छुक असल्यास पात्र उमेदवारांची यादी तयार करण्याबाबत सर्व विद्यापीठांना निर्देशित करण्यात आले होते आणि त्यासाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) यांच्या माध्यमातून विहीत नमुन्यामध्ये आवश्यक ती माहिती एकत्रित करण्याच्या दृष्टीने एक नमुना महाराष्ट्र ज्ञान महामंडळाने तयार केलेला असून सोबत प्रपत्राचा नमूना जोडलेला आहे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
4 SEP 2010
आवक क्र. 8243

३.	प्रस्तुत प्रकरणी आपणांस असे कळवू इच्छितो की, महाराष्ट्र ज्ञान महामंडळामार्फत तयार करण्यात आलेल्या विहीत प्रपत्रामध्ये कार्यरत प्राचार्य / प्राध्यापक संवर्गातील पात्र व इच्छुक उमेदवारांनी त्यांची वैयक्तिक माहिती विद्यापीठाला त्यांच्या संकेत स्थळावरील (website) link वर विहीत प्रपत्रामध्ये भरुन पाठविण्याचे आवाहन करावे. आणि तशाप्रकारची जाहिरात सुध्दा विद्यापीठ स्तरावर देण्यात यावी. जेणेकरुन आजमितीस ज्या संलग्नित महाविद्यालयामधील प्राचार्य पदावर पात्रताधारक व अनुभवी उमेदवार मिळण्याची जी अडचण उदभवली आहे त्यासाठी एक तोडगा निघणे शक्य आहे. त्याबाबत सर्व विद्यापीठांनी दक्षता घेऊन विहीत नमुन्याप्रमाणे प्राप्त झालेल्या तपशिलवार माहितीच्या आधारे संबंधित संलग्नित महाविद्यालयामध्ये नियुक्ती बाबत नियमानुसार पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवावी. या संदर्भात काही तांत्रिक अडचणी आल्यास त्यासाठी डॉ.अतुल वाडेगांवकर, महाव्यवस्थापक (शिक्षण) MKCL यांचे मार्गदर्शन घ्यावे. त्यांचा इ-मेल पत्ता atulw@mkcl.org व दूरध्वनी क्र. ०२०- २५६३०३०२ व भ्रमणध्वनी क्र. 9892894241 असा आहे.

आपला,

(रा.गो.जाधव)
शासनाचे उपसचिव

प्रत माहितीसाठी :व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे
संचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण / तंत्रशिक्षण )
डॉ.अतुल वाडेगांवकर, महाव्यवस्थापक (शिक्षण), महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे

जा.क्रं.विकापु/आस्था/संकिर्ण/२०१०/ ८९३	तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे-४११ ०१६
दिनांकः 20 SEP 2010

सोबत शासन निर्णयाची /पत्राची छायाप्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी , त्यांना कळविण्यात येते की, शासन निर्णयातील /पत्रातील सुचनांचे अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

प्रत- माहिती अधिकारी/प्रशासकीय अधिकारी/सहा.संचालक (अतां)/आस्था१/२/३अ/३ब/४ /लेखा/विद्यार्थी/स.सा. /गोपनिय/संगणक विभाग संकेत स्थळावर प्रदर्शित करावा.

(भि.द.मिसाळ)
प्रशासकीय अधिकारी,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

# FORMAT

| | | |
|---|---|---|
| a) | Time Stamp | |
| b) | Full Name | |
| c) | Correspondence Address | |
| d) | City | |
| e) | Tahsil | |
| f) | District | |
| g) | State | |
| h) | Pin Code | |
| i) | Country | |
| j) | Contact Number with STD Code | |
| k) | Mobile Number | |
| l) | email ID | |
| m) | Date of Birth | |

| | | |
|---|---|---|
| n) | **Date of Retirement** | |
| o) | **Qualification** | |
| p) | **Are you a Ph.D.** | |
| q) | **University Name from where Ph.D. is completed** | |
| r) | **Year of completion of Ph.D.** | |
| s) | **Total Experience of Teaching** | |
| t) | **Category** | |
| u) | **If Reserved, then please select category** | |
| v) | **Willing to work as Principal?** | |
| w) | **Are you an Approved/ Incharge Principal** | |
| x) | **Any other relevant information** | |
| y) | **Disclaimer** | |